# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विनानोंदणी सेल्फ टेस्टिंग किटची विक्री होत असल्याबाबत

**(१) १२९०० (३०-०३-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विनानोंदणी सेल्फ टेस्टिंग किटची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर किटची खरेदी करतांना नाव, पत्ता, मोबाईल नंबर व आधार कार्ड न देता शहरातील दुकानांतून सेल्फ टेस्टिंग किट मिळत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या दुकानदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम (११-१०-२०२३) :** (१) दिनांक १७/०१/२०२२ च्या दैनिक वृत्तपत्रात औषधी दुकानांकडे विना नोंदणी टेस्टिंग किटची सर्रास विक्री होत असल्याचे वृत्त प्रकाशित झाले होते.
(२) कोविड सेल्फ टेस्टिंग किटसच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग व अन्न व औषध प्रशासनाने संबंधितांना सूचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने सह आयुक्त (औषधे), छत्रपती संभाजीनगर यांनी कोविड सेल्फ टेस्टींग किटसचा अभिलेख जतन करण्याबाबत किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांना निर्देश दिले होते. सदर सूचनांनुसार छत्रपती संभाजीनगर शहरातील काही औषध विक्रेत्यांच्या तपासण्या अन्न व औषध प्रशासन, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून करण्यात आल्या असून औषध विक्रेत्यांनी सदर सूचनांचे उल्लंघन केले असल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सामान्य नागरिकांना चांगल्या प्रतीची आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याबाबत

**(२) १४४६९ (२५-०८-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामान्य नागरिकांना चांगल्या प्रतीची आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करण्याच्या सूचना मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी विभागास दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी असलेल्या आरोग्याच्या आराखड्याची अंमलबजावणी अद्याप अपूर्ण असल्याने गाव तिथे आरोग्य केंद्र न झाल्याने अनेक गावात आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व गावांमध्ये सामान्य नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळण्याबाबत आणि जेनरिक औषध दुकाने चालू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०८-२०२३) :** (१) होय.
(२) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध उपक्रमांचा प्रकल्प अंमजबजावणी आराखडा तयार करण्याकरीता सर्व जिल्हा स्तरावरुन आवश्यक ते सर्व प्रस्ताव मागविण्यात येतात व त्याची पडताळणी करुन राज्यस्तरावरुन केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येणाऱ्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये सदर प्रस्तावांचा समावेश करण्यात येतो. सार्वजनिक आरोग्य विभागाचे गाव तेथे आरोग्य केंद्र असे धोरण नाही. तथापि, शासनाच्या प्रचलित धोरणानूसार शासन निर्णय दिनांक ०१ जानेवारी १९९६ अन्वये ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यासाठी लोकसंख्येच्या निकषानुसार उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर करण्यात येतात. त्यानुसार आरोग्य संस्था मंजुरीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

| संस्था | लोकसंख्या | |
|---|---|---|
| | बिगर आदिवासी | आदिवासी |
| उपकेंद्र | ५००० | ३००० |
| प्राथमिक आरोग्य केंद्रे | ३०००० | २०००० |
| शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे | ५०००० | - |

त्यानुसार गाव तेथे आरोग्य संस्था उपलब्ध नसली तरी उपरोक्त निकषानुसार कार्यरत असलेल्या आरोग्य संस्थेतंर्गत येणाऱ्या सर्व गावांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते. Health & Wellness कार्यक्रमांतर्गत राज्यात १८६१ प्राथमिक आरोग्य केंद्र, ८३३७ उपकेंद्र व ५१७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतरण प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्रात करण्यात आले आहे. सदर केंद्रामार्फत खालील नमुद १३ प्रकाराच्या सेवा रुग्णांना गावपातळीवर देण्यात येत आहेत.
१. प्रसुतिपुर्व व प्रसुती सेवा २. नवजात अर्भक व नवजात बालकांना दिल्या जाणाऱ्या सेवा ३. बाल्य व किशोरवयीन आजार व लसीकरण सेवा ४. कुटुंब नियोजन, गर्भ निरोधक व आवश्यक आरोग्य सेवा ५. सामान्य रोगांची बाहय रुग्ण सेवा ६. संसर्गजन्य रोग नियोजन व तपासणी ७. असंसर्गजन्य रोग नियोजन व तपासणी ८. मानसिक आरोग्य नियोजन व तपासणी ९. नाक, कान, घसा व डोळे सामान्य आजार संबंधीच्या सेवा १०. दंत व मुखरोग आरोग्य सेवा ११. वाढत्या वयातील आजार व परिहारक उपचार. १२. प्राथमिक उपचार व आपत्कालीन सेवा. १३. आयुष व योग.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तसेच जेनेरिक औषधे दुकानांबाबत विभागाच्या अधिपत्याखालील रुग्णालयाच्या परिसरात एकूण २४१८ आरोग्य संस्थेमध्ये नॅकोफ इंडिया लिमिटेड या संस्थेस जेनेरिक औषधे दुकाने सुरु करण्यास परवानगी देण्यात आली असून भाडेतत्वावर २००-२५० स्केवअर फीट जागा उपलबध करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील कहार, ढिवर, भोई समाजाच्या विविध मागण्यांच्या पुर्ततेबाबत

**(३) १७०१४ (२५-०३-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासेमारी हा भोई समाजाचा प्रमुख व्यवसाय असून भोई समाजाला मत्स्यव्यवसाय करण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे या अडचणी दूर करून भोई समाजाच्या परंपरागत व्यवसायास कायदेशीर हक्क मिळणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील कहार, ढिवर, भोई समाजाला अनुसूचित जमाती संवर्गात समाविष्ठ करणे, समाजाकरीता समाजभवन बांधने, शासकीय तळ्याची लिज शुल्क कमी करणे, मासेमारी संस्थांना जाळे व नाव मोफत उपलब्ध करणे, समाजाच्या गरजु महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा याकरीता कर्ज सुविधा उपलब्ध करणे ई. मागण्यांबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भोई समाजाच्या परंपरागत व्यवसायाच्या अडचणी दूर करुन कहार, ढिवर, भोई समाजांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (१८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) मासेमारी हा भोई समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे, हे खरे आहे. कहार, ढिवर, भोई समाजाला अनुसूचित जमाती संवर्गात समाविष्ठ करणे, समाजाकरीता समाजभवन बांधणे ह्या मागण्याचे निवेदन / पत्र कार्यवाहीसाठी आदिवासी विकास विभागाकडे पाठविण्यात आले आहे.विभागाच्या योजना या पारंपारिक मच्छीमारांसाठी नियमोचित पध्दतीने राबविल्या जातात.

तसेच ०-५०० हे.पर्यंतचे तलाव मच्छिमार सहकारी संस्थांना विनामुल्य दराने ठेक्याने दिले आहेत.

शासन निर्णय दिनांक ०९ फेब्रुवारी २०२३ नुसार तयार मासेमारी जाळी खरेदीवर प्रति सभासद/वैयक्तिक मच्छिमारांस २० कि.ग्रॅ.पर्यंत ५० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.तसेच लाकडी नौका,पत्रा नौका,फायबर नौकांसाठी प्रकल्प किमतीच्या ५० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यात ११ कोटींची वीज चोरी झाल्याबाबत

**(४) १८५२९ (२५-०३-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात ११ कोटींची वीज चोरी केली गेली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच वीज चोरी रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

महावितरण माहे डिसेंबर-२०२२ मध्ये ६७९४ ग्राहकांच्या ठिकाणी २५ कोटी ६४ लाख रुपयांची तसेच जानेवारी-२०२३ मध्ये ५७५२ ग्राहकांच्या ठिकाणी २८ कोटी ६३ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे. महावितरण मधील सुरक्षा व अंमलबजावणी (सुवअं) विभागामार्फत माहे डिसेंबर-२०२२ मध्ये ८९२ ग्राहकांच्या ठिकाणी १२ कोटी ३२ लाख रुपयांची तसेच जानेवारी-२०२३ मध्ये ८८२ ग्राहकांच्या ठिकाणी १५ कोटी ३२ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली आहे.

बेस्ट उपक्रमाव्दारे माहे जानेवारी २०२३ मध्ये १३८ वीज चोरीच्या प्रकरणात रुपये २.१५ कोटी रकमेचा दावा दाखल केला आहे.

अदानी इलेक्ट्रीसिटी, मुंबई लिमिटेडव्दारे सन २०२२-२३ या वर्षात ९२५० वीज चोरी प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे.

(२) याबाबत वीज चोरी प्रकरणातील सर्व ग्राहकांना विद्युत कायदा २००३ च्या तरतूदीनुसार वीज चोरीचे दंडात्मक देयक देण्यात येतात व देयक अदा न करणाऱ्या वीजचोरांवर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात येतात.

महावितरण मधील सुरक्षा व अंमलबजावणी (सुवअं) विभागामार्फत माहे डिसेंबर २०२२ मध्ये विविध पोलीस स्टेशनमध्ये एकूण ५८ वीजचोरांविरुध्द तसेच जानेवारी-२०२३ मध्ये विविध पोलीस स्टेशनमध्ये एकूण ४६ वीजचोरांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आलेले आहे. नोंदविलेल्या गुन्हयांमध्ये पोलीस विभागामार्फत तपास करुन पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येते. वीजचोरी थांबविण्यासाठी उपाययोजना म्हणून महावितरणतर्फे वेगवेगळया पातळीवर वेळोवेळी विशेष तपासणी मोहीम राबवून विजचोरांविरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्ये वीजचोरी न करणेबाबत आवाहन करण्यात येते. महावितरणतर्फे विजचोरीची माहिती देणाऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस देण्यात येते.

अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. या बेस्ट उपक्रमाव्दारेही विद्युत अधिनियम २००३ नुसार कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महारेराच्या संकेतस्थळावर माहिती अदययावत न केल्यामुळे महारेराने जानेवारीत सुमारे १९ हजार ५३९ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटिसा दिल्याबाबत

**(५) १८९७३ (०४-०८-२०२३) श्री.महादेव जानकर, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके : तारांकित प्रश्न क्रमांक १८१७१ ला दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महारेराच्या संकेतस्थळावर माहिती अदययावत न केल्यामुळे महारेराने जानेवारी,२०२३ मध्ये सुमारे १९ हजार ५३९ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश प्रकल्पाची नोंदणी झाल्यापासून ही माहिती अदययावत केलेली नसल्याचे आढळले आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, महारेराने पारीत केलेल्या वसूली आदेशांची अंमलबजावणी हि जिल्हाधिकारी स्तरावर प्रभावीपणे होत नसल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील नोटिसांना किती विकासकांनी उत्तरे दिली आहेत,तसेच ज्या विकासकांनी नोटिशीला उत्तर दिले नाही अश्या विकासकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१६-१०-२०२३) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) जानेवारी, २०२३ मध्ये सुमारे १९४५१ प्रकल्पांना नोटीस बजावण्यात आली होती. त्यापैकी ३३२५ विकासकांनी नोटीसींची अंमलबजावणी केली आहे. मार्च, २०२३ मध्ये उर्वरित १६१२६ प्रवर्तकांना दुसरी नोटीस बजावण्यात आली असता, त्यापैकी ३३४० असे एकूण ६६६५ विकासकांनी नोटीसींची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

१२७८६ विकासकांनी महारेराच्या नोटीसेसच्या अनुषंगाने आवश्यक ती विवरणपत्रे दिलेल्या वेळेत अपलोड केलेली नाहीत अशा विकासकांवर प्रकरण निहाय महारेरा प्राधिकरणातर्फे कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वनविभागातील वनरक्षक ते वनक्षेत्राधिकारी यांच्या पदोन्नतीत होत असलेला अन्यायाबाबत

**(६) १९००४ (०८-०८-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १८ मधील प्रश्न क्रमांक १२९७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वनविभागातील सहाय्यक वनसंरक्षक ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक या पदासाठी पदोन्नती ५ ते ६ वर्षात दिली जात आहे किमान १० वर्षात वन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचे शासन धोरण असतानाही वनरक्षक ते वनक्षेत्राधिकारी यांना मात्र १५ वर्षाची प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील वनविभागातील वनरक्षक ते वनक्षेत्राधिकारी यांच्यावर पदोन्नतीत होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना शेती करतेवेळी होणाऱ्या अपघातील विम्याऐवजी अनुदान देण्याबाबत

**(७) १९१०६ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक १७१७७ ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेतात काम करताना अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे इजा झाल्यास वा मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ‘गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना सुरु करण्यात आली असून सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रुपये दोन लाखांची आर्थिक मदत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत राज्यातील किती शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले तसेच उपरोक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दोन लाखांची रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे
(२) राज्यात सन २०२३-२४ या वर्षात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यासाठी शासन निर्णय दिनांक १९/०४/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

सदर योजनेतंर्गत अपघातग्रस्त शेतकरी बांधवाच्या कुटुंबियांना योजनेचा लाभ देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २०/०६/२०२३ अन्वये रुपये १२.०० कोटी व शासन निर्णय दिनांक २८/०७/२०२३ अन्वये रुपये १७.४५ कोटी असे एकूण रक्कम रुपये २९.४५ कोटी इतका निधी शासन स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

त्यानूसार सदर योजना अंमलबजावणीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| वर्ष | प्राप्त विमा प्रस्ताव | मंजूर विमा प्रस्ताव | नामंजूर विमा प्रस्ताव | कागदपत्रा अभावी प्रलंबित | कार्यवाहीत दावे |
|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | ११९४ | ५३३ | ४२ | ५०८ | १११ |

त्यानुषंगाने रक्कम रुपये ३.७९ कोटी इतका निधी प्रत्यक्ष लाभार्थी खाती वर्ग करण्यात आलेला असून उर्वरीत निधी लाभार्थीच्या खाती वर्ग करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## मुंद्राक खरेदीसाठी नवे जाचक नियम शिथील करण्याबाबत

**(८) १९१६६ (०८-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई अप्पर मुद्राक नियंत्रक यांच्या आदेशानुसार नागरिकांनी मुद्रांक खरेदी करतांना स्वत:हा उपस्थित राहून स्वाक्षरी करावी लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या या आदेशाने ऑनलाईन कामकाजाच्या युगात नागरिकांना सरकारी कार्यालयात वारवार जावे लागणार असल्याने आदेशाचा शासनाने फेरविचार करावा यासाठी मुद्रांक विक्रेत्यांनी संपाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या परिपत्रकांचा आढावा घेवून त्यातील जाचक अटी तात्काळ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर आदेशाचा शासनाने फेरविचार करावा यासाठी मुद्रांक विक्रेत्यांनी संपाचा इशारा दिलेला होता,ही बाब खरी आहे.

तथापि, नागरिकांच्या सोईसाठी ई-पेमेंट(e-Payment) ई.एस.बी.टी.आर. (e-SBTR) फ्रँकिंग, ई-चलन व मुद्रांक पेपर या सुविधा उपलब्ध असल्याने सर्वसामान्य नागरिक आता घरबसल्या सदर प्रणालीचा अवलंब करुन कोठुनही २४ x ७ ग्रास प्रणाली अथवा शासनाने प्राधिकृत केलेल्या बँकाव्दारे मुद्रांक शुल्क,नोंदणी फी अथवा इतर रकमांचा भरणा करता येऊ शकल्यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालयात वारंवार जावे लागणार नाही.

(३) होय, हे खरे आहे.

अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांचे दिनांक ०७/०९/२०२२ रोजीच्या आदेशातील मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील मुद्रांक विक्रेत्यांना मुंबई शहर व उपनगर जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील बँका, वित्तीय संस्था, कंपनी किंवा इतर आस्थापना यांना मुद्रांक विक्री करता येणार नाही याबाबत उक्त अधिनियमामध्ये व मुंबई मुद्रांक पुरवठा व विक्री नियम १९३४ मध्ये कोणतीही तरतुद नसल्याने नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे आदेश दिनांक ०५/०४/२०२३ अन्वये अपर मुद्रांक नियंत्रक यांचे दिनांक ०७/०९/२०२२ रोजीचे आदेश तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाने नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाच्या तुकडेबंदीच्या शिफारशींवर निर्णय घेण्याबाबत

**(९) ११९८१ (०८-०८-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जमिनीच्या लेआऊटसाठी परवानगीची पध्दत सोपी करुन त्यामध्ये एकसूत्रीपणा आणावा, त्याचबरोबर जमिनीच्या रेडी-रेकनरमधील दराच्या २५ टक्के रक्कम भरुन तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद घ्यावी आणि ग्रामीण भागात तुकडाबंदीचे क्षेत्र कमी करण्याच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता द्यावी, अशा शिफारशी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने राज्य सरकारला केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र या शिफारशींवर अद्याप निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन उक्त शिफारशींवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

राज्यातील जमिनीच्या लेआऊटसाठी परवानगीची पध्दत सोपी करुन त्यामध्ये एकसूत्रीपणा आणावा, त्याचबरोबर जमिनीच्या रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरुन तुकडाबंदी कायदयाचे उल्लंघन केलेल्या जमिनीची सातबारा उताऱ्यावर नोंद घ्यावी आणि ग्रामीण भागात तुकडाबंदीचे क्षेत्र कमी करण्याच्या प्रस्तावाला अंतिम मान्यता देणेबाबतचा विषय नोंदणी विभागाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे अशा प्रकारची कोणतीही शिफारस/प्रस्ताव नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून शासनास सादर करण्यात आलेला नाही, असे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्याने प्लॉटची खरेदी विक्री चा व्यवहार कार्यालयाच्या कमतरतेबाबत

**(१०) १९२५९ (०८-०८-२०२३) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्याने प्लॉटची खरेदी विक्रीचा व्यवहार कार्यालयाच्या कमतरतेमुळे अतिशय संथ गतीने होत असून शहराच्या जवळपास गांवातील लेआउट मधील दस्त नोंदणी प्रलंबित असल्याने नागरीकामध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होत असल्याची गंभीर बाब माहे मे २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शहरात दस्त नोंदणी कार्यालय तसेच ग्रामीण व शहराचे कार्यालय वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०९-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अमरावती शहरात ग्रामीण भागात नव्याने झपाटयाने विकास होत असल्यामुळे खरेदी-विक्रीचे व्यवहारात अचानकपणे वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक शनिवारी सुट्टीच्या दिवशी सदर कार्यालय सुरु ठेवले असून दररोज त्या कार्यालयाचा दस्त नोंदणीचा वेळ १ तासानी वाढवून दस्तऐवज नोंदणीची कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

अमरावती शहरातील क्र. १, २ व ३ सोबतच ग्रामीण कार्यालयाचे कार्यक्षेत्र सामाईक केल्यास नवीन कार्यालयाचा खर्च वाचेल. तसेच कामाची विभागणी होवून एकाच कार्यालयावर येत असलेला ताण कमी होईल या दृष्टिने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्याकडून परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील (जि.जळगाव) येथील कृषी विभागातील रिक्त पदांबाबत

**(११) १९२७३ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील (जि.जळगाव)येथील कृषी विभागातील पंचनामे करणाऱ्या कृषी सहायकांची २४० तर एकूण ५९५ पदे रिक्त आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी सहायकांची पदे रिक्त असल्यामुळे शेतकऱ्यांना सेवा मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने (जि.जळगाव) येथील कृषी सहायकांची व अन्य रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०९-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कृषी विभागातील जळगाव जिल्ह्यामध्ये कृषी सहायकांची एकूण ४९५ मंजूर पदे असून त्यापैकी २२६ पदे भरलेली व २६९ पदे रिक्त आहेत.

तसेच जळगाव जिल्ह्यामध्ये कृषी विभागाची एकूण ८२४ पदे मंजूर असून (गट-ड वगळून) त्यापैकी ३८१ पदे भरलेली व ४४३ पदे रिक्त आहेत.

(२) कृषी सहायकांच्या रिक्त पदांचा अतिरीक्त पदभार नजिकच्या कृषी सहाय्यक यांचेकडे देवून कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून शेतकऱ्यांना सेवा मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे.

(३) नाशिक विभागामध्ये मर्यादित विभागीय परिक्षेव्दारे कृषी सहाय्यक संवर्गामधून ९४ उमेदवारांना कृषी पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्यात आली असून त्यापैकी ४६ कृषी पर्यवेक्षकांना जळगाव जिल्ह्यात पदस्थापना देण्यात आली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार नाशिक विभागामधील लिपिकवर्गीय पदांकरीता लिपिक टंकलेखक-५५ पदे व उर्वरित १८ पदांकरीता भरती प्रक्रिया कार्यान्वित आहे. तसेच नाशिक विभागातील कृषी सहाय्यकांच्या ३३६ पदांकरीता दिनांक ११/०८/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा-२०२१ करीता एकूण २०२ पदांचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहीर केला असून शिफारस पात्र उमेदवारांची शैक्षणिक प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणी इ. कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर या उमेदवारांमधून जळगाव जिल्ह्यातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्याकरीता प्राथम्याने विचार करण्यात येईल. तसेच कृषी सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे आणि महाराष्ट्र कृषी प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

तसेच पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर व विभागस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यात केळी पिकावर कुकुंबर मोझाक विषाणू (सीएमव्ही) च्या प्रादुर्भावाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१२) १९२९२ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५२९० ला दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ या कालावधीत केळी पिकावर कुकुंबर मोझाक विषाणू (सीएमव्ही) च्या प्रादुर्भावाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून ऑक्टोबर २०२२ व मार्च २०२३ मध्ये जिल्हा प्रशासनाने वेगवेगळे दोन प्रस्ताव पाठविले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनाकडे पाठविण्यात आलेल्या दोन्ही प्रस्तावामध्ये रुपये २७ कोटी रक्कमेची तफावत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत तसेच सीएमव्ही या रोगाचे उच्चाटन करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, पुणे यांनी जळगाव जिल्ह्यातील केळी पिकाचे सी.एम.व्ही.रोगामुळे एकूण ८,७७१ हेक्टर क्षेत्राकरीता पुर्नलागवडीसाठी आवश्यक केळी रोपे संख्या ३,८९,७७,६५७ करीता खुल्या बाजारातील ऊती संवर्धीत केळी रोपांच्या रुपये १५/- प्रति रोप नुसार रुपये ५८४६.६४ लाख एवढा निधी चा प्रस्ताव शासनास सादर केला.

तसेच, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी महसूल व वन विभागाने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील मदतीच्या दराप्रमाणे (फळपिकांसाठी रुपये ३६,०००/- प्रति हेक्टर) जळगाव जिल्ह्यातील केळी पिकावरील कुकुंबर मोझॅक व्हायरस (सी.एम.व्ही) रोगाच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीकरीता एकूण क्षेत्र ८,७७१ हेक्टर क्षेत्राकरीता रक्कम रुपये ३१५७.५० लाख रक्कमेचा मागणी प्रस्ताव शासनास सादर केला आहे

महसूल व वन विभागाने शासन निर्णय दिनांक ०५/०९/ २०२३ नुसार केळी पिकावर कुकुंबर मोझॅक विषाणू (सी.एम.व्ही.) च्या प्रादुर्भावाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रुपये १९७३.४४ लाख निधी शासनस्तरावरून मंजूर करण्यात आला आहे. सी.एम.व्ही. रोगाचे उच्चाटन व व्यवस्थापनाविषयी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रेसनोट प्रसिध्द करणे, ऑनलाईन सभा, शेतकरी मेळावे, शेतीशाळा आयोजन, शास्त्रज्ञ भेटी इत्यादी कामे नियमित करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देसाईगंज (जि.गडचिरोली) येथील तहसिल कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय कर्मचारी निवासस्थान बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(१३) १९३५४ (०८-०८-२०२३) श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देसाईगंज (जि.गडचिरोली) येथील सर्व्हे नं. २४/५ या जागेवर तहसिल कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्याचे सन २०११ मध्ये १ कोटी ४२ लक्ष रूपयाचे कार्यादेश आदेश देवूनही ११ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप निधीअभावी निवासस्थान बांधकाम

झाले नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवासस्थानाच्या बांधकामास अद्याप शासनाने निधी न देण्याची कारणे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चोकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निवासस्थानाच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१८-०९-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली येथे कार्यालयीन संकुलाच्या बांधकामास रुपये १.७९ कोटी रक्कमेस तसेच देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली येथील निवासस्थानांसाठी रुपये १.९९ कोटी रकमेस दिनांक ०८/०३/२०१० अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी, कार्यालयीन संकुलाच्या कामावर रुपये १.९५ कोटी व निवासस्थानाच्या कामावर रुपये २७.८८ लक्ष इतका खर्च झाला आहे. प्रस्तुत कामांना सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असून, सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्नच नाही.

---

## सीएचबी प्राध्यपक तुटपुंज्या पगारावर उदरनिर्वाह करीत असल्याबाबत

**(१४) १९४६२ (०४-०८-२०२३) श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १७८२३ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र व राज्य शासनाने आर्थिक कारणामुळे तासिका तत्वावर (सीएचबी) धोरण सुरू केले त्यातून उच्च शिक्षित मनुष्यबळ अतिशय कमी पैशात मिळत असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली १० वर्षे भरती प्रक्रियाच थांबविली असल्याने राज्यात लाखो सहाय्यक सहयोगी प्राध्यापक यांची पदे रिक्त आहेत, सीएचबी प्राध्यपक तुटपुंज्या पगारावर उदरनिर्वाह करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दरवर्षी नेट- सेट उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये मोठी भर पडत असल्यामुळे उच्च विद्या विभूषितांना वेठबिगाराची (वेटर, मॅनेजर, तसेच रस्त्यावर पुस्तके विकणे, गॅस वितरण करणे) अशी कामे करावी लागत आहेत, तसेच दहा वर्षांत नेट परीक्षा उत्तीर्ण लाखो विद्यार्थी व पीएचडीधारक हजारो आणि विद्यार्थी संख्या कोटीच्या पुढे आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाविद्यालय व विद्यापीठात १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका (सीएचबी) धोरण पूर्णत: बंद करावे, कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट झाल्यानंतर सीएचबी अनुभव ग्राह्य धरण्यात यावा, जादा कार्यभारासाठी अर्धवेळ कायमस्वरूपी प्राध्यापक पदाची निर्मिती करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान द्यावे आदी प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास तासिका तत्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना / कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०४-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही. भरती प्रक्रिया बंद नसून सुरु आहे.
(४) अशा स्वरुपाची मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे.
(५) व (६) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१८ व दिनांक १२/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ व दिनांक १६/११/२०२२ अन्वये अकृषी विद्यापीठातील शिक्षकीय पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली आहे. तासिका तत्वावरील धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनास शिफारसी करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीची कार्यपध्दती निश्चिती करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील आदर्श शेतकरी पुरस्काराबाबत

**(१५) २०१३९ (०८-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील शेतीत वेगवेगळे प्रयोग करून आदर्श ठरलेल्या शेतकऱ्यांचा राज्य कृषी विभागाकडून आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. मात्र गेल्या ३ वर्षांपासून सदर पुरस्कारांचे वाटप झालेले नसून सदरचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावाचे अवलोकन करून आदर्श शेतकरी पुरस्कार देणे संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०९-२०२३) :** (१) व (२) जळगाव जिल्ह्यातील शेतीत वेगवेगळे प्रयोग करून आदर्श ठरलेल्या शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून आदर्श शेतकरी पुरस्कार असा स्वतंत्र पुरस्कार देण्यात येत नाही. मात्र राज्यात दरवर्षी शेती व शेतीपूरक क्षेत्रात अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांस अथवा

संस्थेस कृषी विभागामार्फत शेती क्षेत्राशी संबंधित डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषीभुषण, जिजामाता कृषीभुषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडीत पुरस्कार, कृषीभुषण (सेंद्रिय शेती) व युवा शेतकरी इत्यादि पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते.

सन २०२० या वर्षातील विविध कृषी पुरस्कारांकरीता सचिवस्तरीय बैठक संपन्न झाली असून सन २०२१ व २०२२ या वर्षांकरीता पुरस्कारार्थींची निवड करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सन २०२०-२०२२ या कालावधीत कोरोनासदृश्य परिस्थिती असल्यामुळे कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव विहित कालावधीमध्ये सादर करता आले नाहीत.

---

## राज्यात (जि.अकोला) येथील तेल्हारा तालुक्यात हिवरखेड परिसरात रस्त्याची कामे सुरू असल्याने परिसरातील नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात मातीचे अवैद्य उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) २०५५५ (०८-०८-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला)परिसरातील नाल्यांमध्ये मोठमोठे खड्डे पडल्यामुळे शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी अडचण निर्माण झाली असून रस्त्याची कामे सुरू असल्याने परिसरातील नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात मातीचे अवैद्य उत्खनन होत असल्याची बाब माहे एप्रिल २०२३ च्या मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाल्याला मोठा पूर आल्यास शेत वाहून जाण्याची भीती शेतकरी तसेच ग्रामस्थ यांनी दर्शविली असून सदर नाल्यातील उत्खनन केलेल्या कामाची पाहणी करून संबंधितावर कारवाई करण्याची मागणी तहसिलदार तेल्हारा यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हिवरखेड (ता.तेल्हारा जि.अकोला) परिसरातील नाल्यांमध्ये मोठमोठे खड्डे पडल्यामुळे शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी अडचण निर्माण झाली असून रस्त्याची कामे सुरू असल्याने परिसारातील नाल्यामधुन मोठ्या प्रमाणात मातीचे अवैध उत्खनन होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली नाही.

जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक १०/०१/२०२३ च्या आदेशान्वये हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत रस्त्याच्या बांधकामासाठी लागणाऱ्या गौण खनिजाच्या (Ordinary Earth) अमृत सरोवर योजनेंतर्गत हिवरखेड नाल्यामधुन गाळ काढून पाण्याची पातळी वाढविण्याच्या दृष्टीने ७०६७ ब्रासच्या खोलीकरणास परवानगी दिली. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, तेल्हारा यांनी केलेल्या पाहणीत संबंधित कंपनीने या ठिकाणाहून अतिरिक्त उत्खनन झाल्याचे दिसून आलेले नाही.

---

## राज्यात मांसल आणि लेयर पोल्ट्री राज्यस्तरीय समन्वय समितीचे गठन करण्यात आल्याबाबत

**(१७) २०६२९ (०८-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मांसल आणि लेयर पोल्ट्री व्यावसायिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी राज्यस्तरीय कुकुट समन्वय समितीचे गठन करण्यात आले असून या समितीने चार बैठका घेऊन त्यातील मुद्दे शासनाकडे पाठवण्यात येऊनही अद्याप कोणताच निर्णय न झाल्याने पोल्ट्री धारक मोठ्या आर्थिक समस्येत असल्याची बाब माहे जून २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, राज्यात करारदार आणि वैयक्तिक स्तरावर पोल्ट्री व्यवसाय करणाऱ्यांची संख्या ९ लाखाहून अधिक असून त्यांच्या आर्थिक समस्या सुटत नसल्याने तीन पोल्ट्री व्यवसायिकांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पोल्ट्री धारकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) राज्यात खाजगीरित्या व्यावसायिक कुक्कुट पालन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्या यांना कुक्कुट पालन व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आले आहे. या समितीमध्ये मांसल कुक्कुट, अंडी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी व NECC च्या प्रितिनिधींचा समावेश आहे. या समितीच्या नियमितपणे बैठका होतात.

कुक्कुट पालन व्यवसाय हा स्वतंत्र उद्योग न समजता शेती व्यवसाय समजण्यात येवून त्यांना आकारण्यात येणारा ग्रामपंचायत कर माफ करण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभाग तसेच, कुक्कुट व्यवसायास कृषी पंपाच्या दरानुसार विद्युत दर आकारणी करण्याच्या अनुषंगाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

राज्यातील पोल्ट्री व्यवसायावर परिणाम होवू नये म्हणून पशुसंवर्धन विभागामार्फत जनजागृती करण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर माहिती व जनसंपर्क मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. तसेच ॲस्कॅड योजनेतील Control of Emergent and Exotic livestock and poultry diseases या घटकाअंतर्गत surveillance करण्यात येते.

---

## कोयना(जि.सातारा) धरणातील वीज निर्मितीला पाणी टंचाई असल्याबाबत

**(१८) २०६३५ (०४-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना (जि.सातारा) धरणातील पाण्याने वीज निर्मिती करण्यात येते परंतु टंचाईमुळे धरणातील वीज निर्मितीवर परिणाम झाला असल्याने कोयना वीजप्रकल्पाचा चौथा संच बंद पडला असून इतर संचही बंद पडण्याच्या स्थितीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने वीज निर्मितीसाठी कोणती उपाययोजना हाती घेतली वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

कोयना धरणातील पाण्याची पातळी दिनांक ८ जून, २०२३ रोजी २०३६ फूट इतकी खाली गेल्याने व ही पातळी टप्पा ४ च्या वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या किमान पाणी पातळीच्या म्हणजेच २०२८ फूट च्या जवळ पोहचल्याने तांत्रिक कारणास्तव टप्पा क्र. ४ येथील संच (४x२५० मे.वॅट) दिनांक ८ जून, २०२३ पासून वीजनिर्मितीसाठी बंद ठेवण्यात आले होते.

परंतु कोयना धरणाच्या पाणी पातळीत वाढ होऊन तांत्रिकदृष्ट्या वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या किमान पाणीपातळीच्या वर आल्यामुळे कोयना टप्पा क्र. ४ चे संच दिनांक १०/०७/२०२३ रोजी SLDC च्या वीजेच्या मागणीनुसार चालू करण्यात आले असून ते सद्य:स्थितीत चालू आहेत.

तसेच कोयना टप्पा क्र. १ व २ (६०० मे. वॅट) आणि कोयना टप्पा क्र. ३ (३२० मे. वॅट) येथील संच विजेच्या मागणीनुसार चालूच आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सन २०२० ते २०२२ या कालावधीत तुकडेबंदी, महारेराच्या नियमांचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१९) २०७०८ (०८-०८-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०२० ते २०२२ या कालावधीत तुकडेबंदी, महारेराच्या नियमांचे उल्लंघन केल्याबाबतच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर दाखल झाल्याने मा.महसूल मंत्री महोदयांनी अशा दस्तांची फेरतपासणी करण्याचे आदेश नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तदनुषंगाने दस्तांची फेरतपासणी करण्यासाठी नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने स्वतंत्र पथकाची नियुक्ती केली आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पथकाकडून आजतागायत किती दस्तांची फेरतपासणी करण्यात आली आहे, त्यात काय आढळून आले आहे आणि राज्यात मालमत्ता व्यवहारात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

शासन निर्देशाच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी " दिनांक ८ फेब्रुवारी,२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांच्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात सन २०२० ते २०२२ या तीन वर्षाच्या कालावधीतील नोंदणी झालेल्या सर्व दस्तांची तपासणी नोंदणी नियम १९६१ च्या नियम ४४ (आय) मधील तरतुदींच्या

अनुपालनाच्या अनुषंगानेच न-करता सर्वकष तपासणी (मुल्यांकनासहीत) सह जिल्हा निबंधक कार्यालय यांचे स्तरावर करणेबाबत कालबध्द कार्यक्रम आखून उक्त तपासणी एक वर्षाच्या आत पूर्ण करुन अहवाल त्यांना सादर करण्याचे कळविले आहे

(३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविल्यानुसार उक्त तपासणी पथकाकडून तपासणी करण्यात येत असून दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजीपर्यंत एकूण ६,१४,५४२ दस्तांची तपासणी करण्यात आली आहे. उर्वरित दस्तांची तपासणी कालबध्द पध्दतीने करण्यात येत असून तपासणी करण्यात आलेले आक्षेप अंतिम करण्याची कार्यवाही सबंधित सह जिल्हा निबंधक आणि नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, यांचे स्तरावर सुर आहे. त्याअनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून उक्त तपासणीबाबतचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर उक्त अहवालामध्ये नमूद बाबींच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रकरणपरत्वे संबंधितांवर नोंदणी अधिनियमाच्या तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमाच्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत गेल्या दोन वर्षात घरांच्या किंमती २० लाखांनी वाढल्या असल्याबाबत

**(२०) २०७५२ (०८-०८-२०२३) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) मुंबईत महागलेले कर्ज, मुद्रांक शुल्कवाढ आणि कर्जाच्या गहाणखत खर्चाची वाढ यामुळे गेल्या दोन वर्षात घरांच्या किंमती तब्बल २० लाख रुपयांनी वाढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ एप्रिल,२०२३ पासून नवे रेडी रेकनर दर लागू होत असून त्याचवेळी मुद्रांक शुल्कात आणखी एक अधिभार जोडला जाणार असल्यामुळे येथील घरांच्या किंमती आणखी वाढणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन येथील घरांच्या किंमती नियंत्रणात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मुद्रांक शुल्क दरात दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून नोंदणी व मुद्रांक विभागाने कोणतीही वाढ केलेली नाही.

(२) व (३) दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून मुद्रांक शुल्कात आणखी एक अधिभार जोडणेबाबत शासनाकडुन नोंदणी विभागास कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत.

तसेच मुद्रांक शुल्कासोबत आकारणी करण्यात येत असलेले जिल्हा परिषद अधिभार, मेट्रो अधिभार व स्थानिक अधिभार लागु कराण्याची बाब नोंदणी व मुद्रांक विभागाशी निगडीत नाही.

महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम १९९५ च्या नियम ४ च्या उप-नियम क्र.(९) मधील तरतूदी अन्वये शासनाने दिनांक ३१/०३/२०२३ चे पत्रान्वये "वर्ष २०२२-२३ चे वार्षिक दर विवरणपत्रात कोणताही बदल न करता, वर्ष २०२३-२४ मध्ये चालू ठेवण्यात यावेत" असे निर्देश दिले आहेत.

शासनाचे निर्देश विचारात घेऊन सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता, दिनांक ०१/०४/२०२२ पासून अंमलात असलेले सन २०२२-२३ चे वार्षिक दर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शक सूचना व नविन बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवण्यात आलेले आहेत.

सदय:स्थितीत सन २०२४-२५ करीताचे वार्षिक मूल्यदर तक्ते तयार करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.